# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...








आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. १५ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १४३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### महाशिवरात्रीसाठी पीएमपीची विशेष बससेवा

**पुणे :** महाशिवरात्रीनिमित्त (पीएमपी) कडून भाविकांसाठी जादा बसेसची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. स्वारगेट ते नीलकंठेश्वर तसेच कात्रज सर्पोद्यान ते बनेश्वर मंदिर या मार्गांवर पहाटेपासून अतिरिक्त फेऱ्या सोडण्यात येणार आहेत. काही मार्गांवर दर २० मिनिटांनी बससेवा उपलब्ध राहील. तसेच निगडी ते घोराडेश्वर मंदिर पायथा या मार्गावरही विशेष बसची सोय करण्यात आली आहे. भाविकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पीएमपी प्रशासनाने केले आहे.

### 'मविआ'समोर कठीण गणित

**मुंबई :** आगामी राज्यसभा निवडणुकीत महाविकास आघाडीसाठी कठीण आव्हान उभे ठाकले आहे. शरद पवार यांचा कार्यकाळ २ एप्रिलला संपत असून त्यांनी पुन्हा उमेदवारीची तयारी दर्शवल्याची चर्चा आहे. मात्र विधानसभेतील संख्याबळ महायुतीच्या बाजूने झुकलेले दिसते. भाजप, शिवसेना आणि अजित पवार गटाच्या तुलनेत 'मविआ'कडे मर्यादित आमदार असल्याने केवळ एकच जागा राखणे शक्य असल्याचे चित्र आहे. त्यामुळे आघाडीतील एकजूट आणि पवारांच्या उमेदवारीवरच निकालाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

### शिवराय-टिपू तुलना प्रकरणी खळबळ

**मुंबई :** हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना केल्याच्या विधानामुळे राज्यात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वक्तव्याचा निषेध करत माफीची मागणी केली. टिपू सुलतानच्या फोटोप्रकरणी सुरू झालेला वाद राज्यव्यापी झाला आहे.

---

### शशिकांत शिंदे यांची स्पष्ट भूमिका; 'यापुढे कोणतीही चर्चा नाही', राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

# भाजप अनुकूल नसल्यामुळे विलीनीकरणाला पूर्णविराम!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** भाजप अनुकूल नसल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चेला अखेर पूर्णविराम देण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी याबाबत ठाम भूमिका जाहीर करत पुढील सर्व चर्चांना आळा घातला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण होणार का, या प्रश्नावर गेल्या काही दिवसांपासून राज्यात जोरदार चर्चा सुरू होती. मात्र शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आज स्पष्ट शब्दांत सांगितले की, त्यांच्या पक्षाकडून यापुढे विलीनीकरणावर कोणतीही चर्चा होणार नाही. माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही गट एकत्र



येण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. विविध स्तरांवरून बैठका आणि चर्चांचे दावेही करण्यात आले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना शिंदे म्हणाले की, अजित पवार हयात असताना एकत्र येण्याबाबत काही चर्चा झाली होती. मात्र सध्याच्या परिस्थितीत हा विषय पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. आम्हीच विलीनीकरणासाठी उतावीळ आहोत, असे चित्र जाणूनबुजून रंगवले जात आहे, असे शिंदे यांनी सांगितले. दादांच्या निधनानंतर या विषयाची चर्चा रंगली. आम्ही केवळ आमची भूमिका मांडली. जे काही बोललो ते शपथपूर्वक बोललो, असे त्यांनी स्पष्ट केले असले, तरी भाजप यासाठी अनुकूल नसल्यामुळेच हे घुमजाव करण्यात आल्याचे मानले जाते. शरद पवार गटाने राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन पाऊल मागे घेतले का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अजित पवार यांनी घेतलेल्या काही निर्णयांबाबत वापरलेल्या 'चूक' या शब्दावरही शिंदे यांनी स्पष्टीकरण दिले. त्यांना काही बाबींमध्ये सुधारणा करायची होती, असा आमचा आशय होता, असे ते म्हणाले. निवडणुकीनंतर पुढील दिशा ठरवण्यासाठी बैठक अपेक्षित होती. मात्र आता विलीनीकरणासंबंधीच्या जर-तरच्या चर्चा करणार नाही, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. भविष्यात कोणताही प्रस्ताव आल्यास त्यावर पक्ष योग्य वेळी निर्णय घेईल, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केलेल्या टीकेलाही शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले. तटकरे अनुभवी नेते आहेत. त्यांनी त्यांची भूमिका मांडावी. आमचा पक्ष नव्याने उभा करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. कार्यकर्ते आमच्यासोबत निष्ठेने उभे आहेत, असे त्यांनी म्हटले. आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवरही शिंदे यांनी पाठिंबा दर्शवला. संबंधित विषयांची सखोल चौकशी व्हावी आणि अहवाल जाहीर व्हावा, अशी मागणी त्यांनी केली. राज्यसभा निवडणुकीबाबत करण्यात आलेल्या दाव्यांवर अद्याप पक्षांतर्गत चर्चा झालेली नाही. योग्य वेळी भूमिका स्पष्ट केली जाईल, असे सांगत त्यांनी अधिक भाष्य टाळले. शिंदे यांच्या वक्तव्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणावर सध्या तरी पडदा पडल्याचे चित्र आहे. पुढील राजकीय हालचालींकडे राज्याचे लक्ष लागले आहे.न

---

# माजी मंत्र्यांच्या कॉलेजवरील जागेवर बँकेचा कब्जा

### ८ कोटी साठी आ. क्षीरसागर यांना नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**छत्रपती संभाजी नगर :** माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संस्था असून, अनेक महाविद्यालयात पाटोदा येथील महाविद्यालयाच्या जागेवर आठ कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात आले होते त्याचा भरणा न केल्यामुळे पाटोदा येथील महाविद्यालयाच्या जागेवर द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेने ताबा घेतला असून तशी नोटीस आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी प्राचार्य दत्तात्रय आघाव आणि प्राध्यापक नंदकुमार पटाईत यांना पाठवण्यात आली आहे नवगण आदर्श यासह अन्य शिक्षण संस्था या माजी खासदार स्वर्गीय केसर काकू क्षीरसागर यांनी उभारल्या होत्या त्यांचा वारसा त्यांचे जेष्ठ चिरंजीव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे चालवत आहेत प्रामुख्याने त्यांच्याच शिक्षण संस्थेचे पाटोदा येथे पद्मभूषण वसंत दादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय असून या ठिकाणी टोलेजंग इमारत देखील आहे याच महाविद्यालयाच्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीड येथील द्वारकादास नागरी सहकारी बँकेच्या पाटोदा महिला शाखेकडून आठ कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते मात्र हे कर्ज अद्यापही बँकेला दिले गेले नसल्याने बँकेने या महाविद्यालयाच्या जागेचा ताबा घेतला असून तशी नोटीसही वृत्तपत्रात प्रकाशित केली गेली आहे विशेषता आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य दत्तात्रय आघाव नंदकुमार पटाईत या दोन साक्षीदारांना ही नोटीस पाठवण्यात आली आहे .

---

# पुलवामा वर्धापनदिनी मोदींचा काँग्रेसवर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**गुवाहाटी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुलवामा हल्ल्याच्या वर्धापनदिनी आसामची राजधानी Guwahati येथे आयोजित जाहीर सभेत काँग्रेसवर जोरदार टीका केली. देश आज सुरक्षेच्या बाबतीत अधिक सक्षम झाला असून शत्रूंना त्यांच्या घरात घुसून प्रत्युत्तर देण्याची ताकद नव्या भारताने दाखवून दिली आहे, असे ते म्हणाले.

पुलवामा हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करत मोदी म्हणाले की, त्या घटनेनंतर भारताने घेतलेल्या कठोर कारवाईची दखल संपूर्ण जगाने घेतली. 'ऑपरेशन सिंदूर'चा उल्लेख करत त्यांनी देशाच्या वाढत्या सामरिक क्षमतेवर भर दिला. देशात नव्या आपत्कालीन लँडिंग स्ट्रिपसारख्या सुविधा उभारल्या जात असून संरक्षण व्यवस्था अधिक बळकट होत असल्याचे त्यांनी सांगितले. सभेत काँग्रेसवर निशाणा साधताना मोदी म्हणाले की, देशविरोधी विचारांशी तडजोड करणाऱ्या शक्तींना काँग्रेस पाठबळ देते. आसाममध्ये काँग्रेसच्या काळात हिंसाचार, बंद आणि अस्थिरता होती, असा आरोप करत त्यांनी भाजपा-एनडीए सरकारने राज्यात शांतता व विकासाला प्राधान्य दिल्याचा दावा केला.

---

### सुनेत्रा पवारांच्या बैठकीनंतर चर्चांना उधाण

# अरोरा कंपनीबाबत पवार कुटुंबाचा 'यु-टर्न'?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राजकीय सल्लागार म्हणून ओळखले जाणारे नरेश अरोरा आणि त्यांच्या कंपनीबाबत पवार कुटुंबाची भूमिका बदलल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांनी अरोरा यांच्यासोबत घेतलेल्या सलग बैठकींनंतर या चर्चांना अधिकच वेग आला आहे.

माहितीनुसार, अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षासमोरील संघटनात्मक आणि राजकीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील जिजाई बंगल्यावर सुमारे तासभर बैठक झाली. या बैठकीला पार्थ



पवार, जय पवार आणि नरेश अरोरा उपस्थित होते. त्यानंतर तिघांनी शासकीय विश्रामगृहात जाऊन सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. तेथे चौघांमध्ये सध्याच्या राजकीय परिस्थितीवर सविस्तर चर्चा झाल्याचे सूत्रांकडून सांगितले जाते.

बैठकीचा अधिकृत तपशील जाहीर करण्यात आलेला नसला तरी Nationalist Congress Party (राष्ट्रवादी काँग्रेस) मधील संभाव्य घडामोडी, दोन्ही गटांतील संबंध आणि आगामी निवडणुकांची रणनीती या मुद्द्यांवर चर्चा झाल्याचा दावा केला जात आहे. अजित पवार यांच्या अचानक जाण्याने पक्षात निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी भरून काढण्याची जबाबदारी सध्या सुनेत्रा पवार यांच्यावर असल्याचे मानले जाते. त्यामुळे सल्लागारांच्या भूमिकेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दरम्यान, नरेश अरोरा यांच्या कंपनीबाबत पक्षात पूर्वी काही मतभेद असल्याच्या चर्चा होत्या. अजित पवार त्यांच्या कंपनीसोबतच्या कराराचा पुनर्विचार करत असल्याची माहितीही पुढे आली होती. अशा पार्श्वभूमीवर अरोरा यांच्यासोबत पुन्हा बैठक घेतली गेल्याने पवार कुटुंबाने भूमिका बदलली का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

काही सूत्रांच्या मते, बैठकीदरम्यान अरोरा यांनी अजित पवार यांच्या संपर्कातील काही मुद्द्यांबाबत अपेक्षित स्पष्टता दिली नाही. त्यामुळे सुनेत्रा पवार यांनी या विषयावर सावध आणि संतुलित भूमिका घेतल्याचे सांगितले जाते. तथापि, चर्चेनंतर अरोरा यांच्याशी संबंधित निर्णयात काही प्रमाणात 'यु-टर्न' झाल्याचे संकेत राजकीय वर्तुळात दिले जात आहेत.

या घडामोडींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत उत्सुकता वाढली आहे. संघटन बळकट करणे, नेतृत्व स्थिर करणे आणि निवडणुकांसाठी स्पष्ट रणनीती आखणे या सर्व आघाड्यांवर सुनेत्रा पवार यांच्यासमोर मोठे आव्हान आहे. बैठकीनंतर मात्र अधिकृत स्पष्टीकरण न आल्याने तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

---

# कर्ज वसुली करणाऱ्या प्रतिनिधींची गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही

### अशा एजंटांना 'आरबीआय'चा चाप, कारवाई करण्याचे दिले निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** कर्जदारांना दिल्या जाणाऱ्या धमक्या आणि गुंडगिरी रोखण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) कर्ज वसुली प्रतिनिधींच्या नियुक्ती आणि कामकाजाचे नियमन करण्यासाठी नव्या नियमांचा मसुदा जारी केला आहे. त्यानुसार वसुली एजंटांना प्रशिक्षण देणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच वसुलीसाठी करण्यात येणाऱ्या फोनचे रेकॉर्डिंग कर्जदारांना करावे लागेल. वसुली एजंटांना कर्जदारासोबत सभ्यतेने संवाद साधावा लागेल, असेही आरबीआयच्या मसुद्यात स्पष्ट करण्यात आले आहे. या मसुद्यानुसार बँकेचा कर्मचारी किंवा वसुली एजंटने कर्जदारांसोबत बोलताना सभ्यता आणि मर्यादा पाळली पाहिजे. कर्ज वसुलीसाठी कर्जदाराच्या घरी गेल्यानंतरही एजंटांचे वर्तन संयमित असावे. आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी मागील आठवड्यात पतधोरण जाहीर करताना कर्ज वसुलीदरम्यान एजंटांचे वर्तन नियमित करण्यासाठी पावले उचलली जाणार असल्याचे सांगितले होते. कर्ज वसुली एजंटांच्या दंडेलशाही वर्तनामुळे कर्जदारांना अडचणींचा सामना करावा लागल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. त्याची गंभीर दखल घेऊन आरबीआयने बँका आणि इतर वित्तीय संस्थांना संवेदनशीलता ठेवण्याचा सल्ला दिला होता. कर्ज वसुलीदरम्यान अपमानास्पद भाषेचा वापर करू नये. एखाद्या कुटुंबात दु:खद घटना घडली असेल, लग्नकार्य, सण किंवा इतर संकटकाळात कर्ज वसुलीचे प्रयत्न करू नयेत, असे आरबीआयच्या मसुद्यात ठळकपणे नमूद करण्यात आले आहे.

**एजंटांची पडताळणी गरजेची**

आरबीआयने बँकांना केलेल्या सूचनेनुसार कर्जवसुलीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सीचे प्रतिनिधी आणि कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीपूर्वी पडताळणी केली पाहिजे. कर्ज परतफेडीसंदर्भातील प्रकरण न्यायालयात असेल तर बँक कर्मचारी आणि वसुली एजंटांनी अधिक सावध राहिले पाहिजे, असेही रिझर्व्ह बँकेने स्पष्ट केले आहे.

---

### बंगालमध्ये आयोगाचा कडक इशारा

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये मतदार याद्यांच्या विशेष गहन पुनरिक्षणातील त्रुटींवरून निवडणूक आयोगाने कडक भूमिका घेतली आहे. मुख्य सचिव नंदिनी चक्रवर्ती यांनी दोन डब्ल्यूबीसीएस अधिकाऱ्यांसह चार अधिकाऱ्यांविरोधात १७ फेब्रुवारीपर्यंत एफआयआर दाखल करण्याचे आदेश दिले. मुख्य निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आयोगाच्या निर्देशांची अंमलबजावणी न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. दक्षिण 24 परगणा आणि पूर्व मिदनापूरमधील अधिकाऱ्यांविरोधात कारवाईचे आदेश प्रलंबित असल्याचे समोर आले. तसेच अतिरिक्त सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांवरूनही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

---

# पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर

### 165 कोटी खर्च होणार, 45 लाख विद्यार्थ्यांना लाभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर देण्याचा मोठा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या योजनेसाठी तब्बल 165 कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, राज्यभरातील सुमारे 41 लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय शुक्रवारी जारी केला. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा 2009 आणि राष्ट्रीय शैक्षणिक



धोरण 2020च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी अनुकूल आणि आनंददायी शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने म्हटले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गामध्ये शिकत असलेल्या 41 लाख 43 हजार 54 विद्यार्थ्यांना मोफत दप्तर देण्याचा प्रस्ताव शिक्षण संचालकांनी शासनाकडे पाठवला होता. या प्रस्तावानुसार 165 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ज्या महानगरपालिकांकडून त्यांच्या स्वतःच्या विद्यार्थ्यांना दप्तर किंवा त्यासाठीची रक्कम दिली जाते, त्या शाळांतील विद्यार्थ्यांना या राज्यस्तरीय योजनेतून वगळण्यात येणार आहे.

---

### कापूस शेतकरी आणि गारमेंट्स उद्योग धोक्यात असल्याचा आरोप

# भारत-अमेरिका करारावर राहुल गांधींचा हल्लाबोल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारत-अमेरिका व्यापार करारावरून केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. कापूस आणि गारमेंट्स क्षेत्रासंबंधीच्या तरतुदींमुळे देशातील शेतकरी आणि वस्त्रोद्योगाला धोका निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला. राहुल गांधी यांनी सामाजिक माध्यमांवर केलेल्या वक्तव्यात बांगलादेशला अमेरिकेत गारमेंट्स निर्यातीवर शून्य टक्के टॅरिफचा लाभ मिळत असल्याचा उल्लेख केला. मात्र त्यासाठी बांगलादेशने



अमेरिकन कापूस आयात करण्याची अट असल्याचे त्यांनी नमूद केले. याउलट भारताच्या गारमेंट्सवर १८ टक्के टॅरिफ लागू असल्याचे सांगत त्यांनी सरकारकडे प्रश्न उपस्थित केला. संसदेत विचारलेल्या प्रश्नाला मंत्र्यांनी दिलेल्या उत्तराचा दाखला देत राहुल गांधी म्हणाले की, भारतालाही असा लाभ हवा असल्यास अमेरिकेकडून कापूस आयात करावा लागेल, असे सांगण्यात आले. ही बाब देशापासून लपवण्यात आली का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या परिस्थितीचे वर्णन करताना राहुल गांधी यांनी पुढे आड अन् मागे विहीर अशी स्थिती निर्माण झाल्याचे म्हटले. अमेरिकन कापूस आयात केल्यास देशातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होईल, तर तो पर्याय नाकारल्यास भारतीय वस्त्रोद्योग १८ टक्के टॅरिफच्या ओझ्याखाली दबला जाईल, असे त्यांनी सांगितले. बांगलादेश भारताकडून कापूस आयात कमी करण्याच्या दिशेने पावले उचलू शकतो, असा आरोपही त्यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधत राहुल गांधी यांनी हा करार राष्ट्रीय हिताचा नसून दबावाखाली केलेला निर्णय

**काय आहे राहुल गांधींचा आरोप?**

- लोकसभेतील विरोधी पक्षनेते Rahul Gandhi यांनी भारत-अमेरिका व्यापार करारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. बांगलादेशला अमेरिकेत गारमेंट्स निर्यातीवर शून्य टक्के टॅरिफ सवलत मिळते, मात्र त्यासाठी अमेरिकन कापूस आयात करण्याची अट आहे, असे त्यांनी नमूद केले. भारताच्या गारमेंट्सवर मात्र १८ टक्के टॅरिफ लागू असल्याचा दावा त्यांनी केला. भारतालाही सवलत हवी असल्यास अमेरिकेकडून कापूस आयात करावा लागेल, अशी अट असल्याचे सांगितले जात असल्याने देशातील कापूस शेतकरी अडचणीत येऊ शकतात, असा इशारा त्यांनी दिला. पंतप्रधान Narendra Modi यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा करार राष्ट्रीय हिताला पूरक नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

वाटत असल्याचे म्हटले. देशाच्या आर्थिक कणाच मानल्या जाणाऱ्या कापूस शेती आणि वस्त्रोद्योग या दोन्ही क्षेत्रांवर याचा विपरीत परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले. भारतामधील टेक्सटाइल उद्योग आणि कापूस शेती कोट्यवधी लोकांच्या उपजीविकेशी निगडित असल्याचे सांगत राहुल गांधी यांनी या क्षेत्रांवर आघात झाल्यास मोठ्या प्रमाणावर रोजगार धोक्यात येईल, असा इशारा दिला.

---

# शासन सेवेत ओबीसी एससी, एसटीचा डंका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत आयएएस, आयपीएस आणि आयएफएस या देशातील सर्वाधिक प्रतिष्ठित सेवांमध्ये नोकरभरती केली जाते. याद्वारे गेल्या पाच वर्षांत(२०२० ते २०२४) आरक्षित वर्गातील किती उमेदवारांची नियुक्ती झाली? याबाबतची माहिती समोर आली आहे. सरकारने संसदेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, ओबीसी, एससी आणि एसटी वर्गातील सर्वाधिक उमेदवारांची नियुक्ती भारतीय पोलिस सेवामध्ये झाल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यसभेत कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि पेन्शन मंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह यांनी लेखी उत्तराद्वारे दिलेल्या माहितीनुसार, यूपीएससी नागरी सेवा परीक्षा २०२० ते २०२४ या कालावधीत थेट भरतीद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, यूपीएससीमार्फत जाहीर होणा-या रिक्त पदांच्या संख्येत सातत्याने घट होत असल्याचेही समोर आले आहे. २०२४ : १,०५६ पदे, २०२५ : ९७९ पदे, २०२६ : फक्त ९३३ पदे. गेल्या तीन वर्षांत जाहिरातीत येणा-या पदांची संख्या कमी होत असल्याने उमेदवारांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. एकूण तीनही सेवांमध्ये ओबीसी : ७३१ उमेदवार एससी : ३७१ उमेदवार,एसटी : १८६ उमेदवार.रिक्त पदांची स्थिती१ जानेवारी २०२५ पर्यंतच्या सिव्हिल लिस्टनुसार सेवांमधील रिक्त पदांची स्थिती पुढीलप्रमाणे आहे.आयएएस मंजूर पदे : ६,८७७ रिक्त पदे : १,३००. आयपीएस मंजूर पदे : ५,०९९ रिक्त पदे : ५०५.आयएफएसमंजूर पदे : ३,१९३रिक्त पदे : १,०२९ सर्वाधिक रिक्त पदे भारतीय वन सेवामध्ये

## संपादकीय

### भावनांचा उद्रेक की धोरणांची चिकित्सा?



**भारत आणि अमेरिका यांच्यातील नव्या व्यापार कराराने देशाच्या राजकीय वर्तुळात आणि अर्थविषयक चर्चांमध्ये मोठी खळबळ उडवली आहे. हा करार केवळ आयात-निर्यात, शुल्कदर किंवा गुंतवणूक यापुरता मर्यादित नाही; तो भारताच्या आर्थिक स्वायत्ततेचा, जागतिक धोरणात्मक स्थानाचा आणि अंतर्गत राजकीय दिशादर्शनाचा प्रश्न बनला आहे. त्यामुळेच या करारावरून संसदेत रंगलेला वाद केवळ आर्थिक न राहता भावनिक आणि वैचारिक स्वरूप धारण करत आहे.**

व्यापार कराराच्या संभाव्य परिणामांबाबत अर्थतज्ज्ञांमध्ये मतभेद दिसून येतात. काहींच्या मते अमेरिकेसारख्या महासत्तेशी व्यापक करार केल्यास भारतीय उद्योगांना मोठी बाजारपेठ मिळू शकते, निर्यात वाढू शकते आणि परदेशी गुंतवणुकीला चालना मिळू शकते. विशेषतः तंत्रज्ञान, संरक्षण, ऊर्जा आणि सेवा क्षेत्रात दीर्घकालीन संधी निर्माण होऊ शकतात. मात्र दुसरीकडे काही तज्ज्ञांचा इशारा आहे की, शुल्क कपात किंवा बाजारपेठ उघडण्याच्या अटींमुळे कृषी, औषधनिर्मिती, दुग्धव्यवसाय आणि लघुउद्योगांवर ताण येऊ शकतो. अशा परिस्थितीत कराराचे फायदे-तोटे संतुलितपणे मांडणे अत्यावश्यक ठरते. याच पार्श्वभूमीवर लोकसभेत विरोधी पक्षनेते Rahul Gandhi यांनी केलेले भाषण चर्चेचा केंद्रबिंदू ठरले. त्यांनी या कराराला राष्ट्रीय अस्मितेशी जोडत सरकारवर तीव्र टीका केली. ‘भारत माता’चा उल्लेख करत त्यांनी सरकार देशहिताशी तडजोड करत असल्याचा आरोप केला. त्यांच्या भाषणामुळे सत्तापक्ष आणि विरोधकांमध्ये तीव्र शब्दयुद्ध पेटले. समर्थकांच्या मते त्यांनी कराराच्या संभाव्य धोक्यांकडे लक्ष वेधले; तर टीकाकारांच्या मते भावनिक आवाहनांमुळे कराराच्या तांत्रिक आणि आर्थिक बाबींची चर्चा मागे पडली. इतिहासाचा संदर्भ घेतला तर माजी पंतप्रधान Manmohan Singh यांच्या कार्यकाळातील भारत-अमेरिका अणुकराराची आठवण अपरिहार्य ठरते. त्या वेळीही देशात तीव्र राजकीय मतभेद होते. कराराला काहींनी राष्ट्रीय सार्वभौमत्वाला बाधक म्हटले, तर काहींनी तो भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी अत्यावश्यक पाऊल मानले. मात्र त्या काळात संसदेत कराराच्या अटी, परिणाम आणि मर्यादा यांवर तुलनेने सविस्तर चर्चा झाली. सरकारने भूमिका स्पष्ट केली आणि विरोधकांनी तीव्र पण मुद्देसूद आक्षेप नोंदवले. अखेर विश्वासदर्शक ठरावापर्यंत परिस्थिती गेली, परंतु चर्चेचा केंद्रबिंदू धोरणात्मक मुद्द्यांवर राहिला. आजच्या घडीला पंतप्रधान Narendra Modi यांच्या नेतृत्वाखालील सरकारसमोर वेगळी पण तितकीच महत्त्वाची कसोटी आहे. या व्यापार करारातील नेमक्या तरतुदी काय आहेत? कोणत्या क्षेत्रांना सवलती देण्यात आल्या आहेत? त्याबदल्यात भारताला कोणते ठोस लाभ मिळणार आहेत? स्थानिक उद्योगांचे संरक्षण करण्यासाठी कोणती सुरक्षितता तरतुदी करण्यात आल्या आहेत? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे संसद आणि जनतेसमोर मांडली जाणे आवश्यक आहे. पारदर्शकता ही लोकशाहीतील विश्वासाचा पाया असतो. या संपूर्ण वादातून एक मोठा मुद्दा पुढे येतो—राजकीय भावनाद्री विरुद्ध व्यावहारिक अर्थकारण. लोकशाहीत भावना अनिवार्य असतात. त्या जनमानसाशी संवाद साधतात, राजकीय भूमिका स्पष्ट करतात आणि सरकारला जबाबदार धरण्याचे काम करतात. मात्र आंतरराष्ट्रीय व्यापार करारांसारख्या गुंतागुंतीच्या विषयांवर केवळ भावनिक भाष्य पुरेसे नसते. अशा करारांचे परिणाम दीर्घकालीन असतात आणि त्यांचा प्रभाव लाखो उद्योग, शेतकरी, कामगार आणि ग्राहकांवर पडू शकतो. जागतिकीकरणाच्या युगात कोणताही देश पूर्णतः स्वयंपूर्ण राहू शकत नाही. मोठ्या अर्थव्यवस्थांशी करार करताना तडजोडी अपरिहार्य असतात. प्रश्न असा असतो की त्या तडजोडींचा देशाला एकूण फायदा किती आणि तोटा किती. त्यामुळे या कराराची चिकित्सा ‘देशभक्ती’ विरुद्ध ‘देशद्रोह’ अशा भावनिक चौकटीत न करता आकडेवारी, विश्लेषण आणि तज्ज्ञांच्या मतांच्या आधारे करणे गरजेचे आहे. एकंदर पाहता, भारत-अमेरिका व्यापार करारावरून निर्माण झालेला संघर्ष हा भारतीय लोकशाहीच्या परिपक्वतेची कसोटी आहे. संसद ही केवळ आरोप-प्रत्यारोपांची रंगभूमी नसून धोरणांचे विवेचन करण्याचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. सरकारने स्पष्टता आणि उत्तरदायित्व दाखवावे, तर विरोधकांनी अभ्यासपूर्ण आणि तथ्याधिष्ठित टीका करावी—ही लोकशाहीची अपेक्षा आहे. भावनांच्या लाटेत राजकीय लाभ मिळू शकतात; परंतु देशाच्या आर्थिक भवितव्यासाठी आवश्यक आहे ती सखोल, संयमी आणि दूरदृष्टीने युक्त चर्चा.

# अरवलीची नवी व्याख्या की नव्या संकटांची चाहूल?

**» दिल्लीपासून हरियाणा, राजस्थानमार्गे गुजरातमधील अहमदाबादपर्यंत सुमारे ६७० किलोमीटर पसरलेल्या या प्राचीन पर्वतरांगा — सध्या नव्या वादाच्या केंद्रस्थानी आहेत. कारण आहे केंद्र सरकारने सुचवलेली अरवलीची नवी व्याख्या. शंभर मीटरपेक्षा जास्त उंचीचे डोंगर आणि अशा दोन डोंगरांमध्ये किमान पाचशे मीटरचे अंतर, अशी नवी अट घालण्यात आल्याने या निकषात न बसणाऱ्या डोंगरांवर खाणकामास मोकळीक मिळू शकते, अशी भीती पर्यावरणवाद्यांकडून व्यक्त होत आहे.**

ही चिंता केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांपुरती मर्यादित नाही. पर्यावरण क्षेत्रातील अभ्यासक, कार्यकर्ते आणि तज्ज्ञ यांच्याकडूनही हा मुद्दा गंभीरतेने मांडला जात आहे. केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्री Bhupender Yadav यांनी या भीतीला उत्तर देताना, अरवलीच्या एकूण क्षेत्रफळाच्या केवळ ०.१९ टक्के भागात खाणकाम होणार असल्याचा दावा केला आहे. तसेच ९० टक्के भागाचे संरक्षण कायम राहील, अशी हमीही त्यांनी दिली आहे. मात्र उरलेल्या दहा टक्के भागाचे काय, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

इतिहासाचा मागोवा घेतला तर चिंता का वाढते, हे स्पष्ट होते. गेल्या साठ वर्षांत बेकायदा खाणकामामुळे अरवली पर्वतरांगांच्या सुमारे २५ टक्के भागाची हानी झाल्याचे विविध अहवालांतून समोर आले आहे. या खाणकामातून उभ्या राहिलेल्या माफिया जाळ्यांनी केवळ पर्यावरणाचे नव्हे, तर प्रशासनाच्या यंत्रणांचेही नुकसान केले. परिणामी १९९५मध्ये अरवली क्षेत्रात खाणकाम व बांधकामावर बंदी घालण्यात आली. पुढे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आणि २००२ ते २०१८ दरम्यान विविध खटल्यांतून बंदी कायम ठेवण्यात आली. तरीही प्रत्यक्षात अरवलीचे ओरबाडणे थांबले नाही. सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीने पर्वतरांगांचा मोठा भाग उद्ध्वस्त झाल्याचे निरीक्षण नोंदवले होते.

अरवलीचे महत्त्व केवळ भूगोलापुरते मर्यादित नाही; ते पर्यावरणीय संतुलनाशी घट्ट जोडलेले आहे. देशाच्या वायव्य भागात सुमारे दीड लाख चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापणाऱ्या या डोंगररांगा वाळवंटीकरण रोखण्यात मोलाची भूमिका बजावतात. राजस्थानातील वाळवंट पूर्वेकडे सरकू न देण्याचे नैसर्गिक आवरण म्हणजे अरवली. शिवाय या पर्वतरांगांमुळे भूजल पातळी टिकून राहते, पावसाचे पाणी साठवले जाते आणि स्थानिक हवामान संतुलित ठेवण्यास मदत होते.

दिल्ली आणि आसपासच्या भागात दरवर्षी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये वाढणारे वायुप्रदूषण हा राष्ट्रीय चिंतेचा विषय बनला आहे. अशा वेळी



अरवलीसारख्या नैसर्गिक हरितभिंतीचे संरक्षण अधिक महत्त्वाचे ठरते. पर्वतरांगांवरील खाणकाम आणि जंगलतोड वाढल्यास हवेतील धूलिकणांचे प्रमाण वाढू शकते, भूजल घटू शकते आणि प्रदूषणाचे दुष्परिणाम तीव्र होऊ शकतात. त्यामुळे अरवलीच्या नव्या व्याख्येमुळे खाणकामास मोकळीक मिळेल, ही शक्यता अनेकांना धोक्याची घंटा वाटते.

केंद्रीय मंत्री यादव यांचा दावा आहे की सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांमुळे नवीन खाणकाम शक्य नाही. परंतु भारतात नियमांच्या पळवाटा शोधण्याची आणि कायद्यांतून मार्ग काढण्याची परंपरा पाहता पर्यावरणवाद्यांची चिंता सहज फेटाळता येत नाही. अनेकदा कागदोपत्री बंदी असली, तरी प्रत्यक्षात बेकायदा उत्खनन सुरूच राहते, हा अनुभव आहे. त्यामुळेच ‘व्याख्या’ बदलणे ही केवळ तांत्रिक बाब नसून त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात.

याच संदर्भात व्यापक चित्र पाहणे आवश्यक आहे. एरव्ही दुष्काळी मानल्या जाणाऱ्या भागांत मुसळधार पाऊस पडणे, तर पावसाळ्यात शहरे पाण्याखाली जाणे — या घटना वाढत आहेत. या केवळ नैसर्गिक आपत्ती नाहीत; त्या मानवनिर्मित संकटांचे संकेत आहेत. पश्चिम घाट, पूर्व घाट, हिमालय आणि अरवली — सर्वच पर्वतरांगांमध्ये बेकायदा खाणकाम, अनियंत्रित बांधकाम आणि जंगलतोड यामुळे निसर्गाचे संतुलन ढासळत आहे.

शास्त्रज्ञ वारंवार इशारा देत आहेत की पर्यावरणीय ऱ्हासाचे परिणाम तात्काळ दिसत नसले, तरी ते दीर्घकालीन आणि गंभीर असतात. जलसंकट, हवामान बदल, जैवविविधतेचा ऱ्हास आणि प्रदूषण यांचा परस्परसंबंध लक्षात घेता अरवलीसारख्या नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण ही केवळ पर्यावरणवादी मागणी नाही; ती राष्ट्रीय गरज आहे.

सरकारने केलेल्या खुलाशांवर विश्वास ठेवणे महत्त्वाचे असले, तरी त्याहून महत्त्वाचे आहे ते पारदर्शक अंमलबजावणी आणि कठोर देखरेख. अरवलीच्या संरक्षणासाठी स्वतंत्र, सक्षम यंत्रणा उभारणे, बेकायदा खाणकामावर कठोर कारवाई करणे आणि स्थानिक समुदायांना पर्यावरण रक्षणात सहभागी करणे आवश्यक आहे.

अरवलीबाबत व्यक्त होणारी भीती ही केवळ विरोधकांची राजकीय भूमिका म्हणून न पाहता, ती एक इशारा म्हणून स्वीकारली पाहिजे. भविष्यातील पिढ्यांसाठी पर्यावरणाचा ठेवा जपायचा असेल, तर अल्पकालीन आर्थिक फायद्यांपेक्षा दीर्घकालीन पर्यावरणीय हिताला प्राधान्य द्यावे लागेल. अरवलीची नवी व्याख्या ही विकास आणि संरक्षण यांच्यातील समतोल साधण्याची संधी ठरावी; अन्यथा ती नव्या पर्यावरणीय संकटांची नांदी ठरू शकते.


## साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीतही झोपडपट्टी सेवाकर भरण्याची सुविधा

### महापालिकेचा निर्णय; ऑनलाईन क्यूआर कोडद्वारे घरबसल्या कर भरण्याची सोय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागामार्फत झोपडपट्टी सेवाकर वसुलीची विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. नागरिकांच्या सोयीसाठी विभागाचे कार्यालय आता साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही खुले ठेवण्यात येणार आहे. सेवाकर भरणा सुलभ व्हावा. आणि करदात्यांची गैरसोय टळावी, यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.






महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर आणि आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपआयुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने सेवाकर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सेवाकर बिलाच्या खालच्या उजव्या बाजूस देण्यात आलेल्या क्यूआर कोडच्या माध्यमातून नागरिकांना घरबसल्या ऑनलाईन पद्धतीने कर भरता येणार आहे. यामुळे वेळ आणि श्रम वाचणार असून डिजिटल व्यवहारांना चालना मिळणार आहे. ज्या नागरिकांना ऑनलाईन पद्धत शक्य नाही, त्यांच्यासाठी कार्यालय सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महापौर रवि लांडगे यांनी नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन वेळेत सेवाकर भरावा आणि शहराच्या विकासात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. उपआयुक्त अण्णा बोदडे यांनीही चालू आर्थिक वर्षातील उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध मोहीम राबविण्यात येत असल्याचे स्पष्ट केले.

## पुणे पोलिसांनी ज्येष्ठ नागरिकाकडून रोकड चोरली, असा रिक्षाचालक अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मदतीचा बहाणा करून एका ज्येष्ठ नागरिकाच्या रोकड चोरी करणाऱ्या रिक्षा चालकाला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात आरोपीकडून ₹२४,००० रोकड आणि चोरीसाठी वापरलेली रिक्षा असे सुमारे ₹१,४९,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस तपासानुसार, इद्रीस शफीक शेख (वय ३६, रा. बावधन; मूळ रा. तुखमापूर, बिजनोर, उत्तर प्रदेश) आणि त्याचा साथीदार ११ फेब्रुवारी रोजी वाकडेवाडी एसटी स्थानकाजवळ परगावाहून आलेल्या ज्येष्ठ नागरिकाला करण्याच्या बहाण्याने मदत करण्याचे येश देऊन त्याच्या कडून रोकड चोरी केली होती. पोलिसांनी शेवटी वाकडेवाडी परिसरात सापळा लावून शेख याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने ज्येष्ठ नागरिकाला मदत करण्याचा बहाणा करून रोकड चोरी करण्याचे कबूल केले, तरीही त्याचा साथीदार अद्याप पसार असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी खडकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून गुन्हे शाखेच्या युनिट ४ कडून तपास चालू आहे. पोलिस निरीक्षक कांचन जाधव, उपनिरीक्षक वैभव मगदूम आणि इतर पोलिस वाहनांनी वेळोवेळी कारवाई केली.

## ३५० व्या शहीदी समागमासाठी भाविकांना सर्वतोपरी सहकार्य – महापौर रवि लांडगे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** ‘हिंद-दी-चादर’ गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागमासाठी खारघर, नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या समागमासाठी पिंपरी चिंचवड शहरातून मोठ्या संख्येने भाविक सहभागी होणार असून त्यांच्या सोयीसाठी महागगर पालिका कटिबद्ध असल्याची ग्वाही महापौर रवि लांडगे यांनी दिली.



या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात महापौरांच्या अध्यक्षतेखाली समन्वय बैठक पार पडली. बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपआयुक्त अण्णा बोदडे तसेच विविध विभागांचे अधिकारी व सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. समागमासाठी जाणाऱ्या भाविकांच्या प्रवासादरम्यान वाहतूक व्यवस्था, पिण्याचे पाणी, वैद्यकीय मदत व अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात येत असल्याचे महापौरांनी स्पष्ट केले.

कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्यात येणार आहे. तसेच शहरात जनजागृती मोहीम, शाळांमध्ये वक्तृत्व व निबंध स्पर्धा तसेच आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याबाबतही चर्चा झाली. विविध समाजघटकांच्या सहकार्याने हा समागम यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# नागरिकांसाठी आरोग्यसेवा सर्वोच्च! महापौर रवि लांडगे यांची वायसीएम रुग्णालयास भेट

### उपचारप्रक्रिया, सुविधा व मनुष्यबळाचा घेतला सविस्तर आढावा; रुग्णांशी थेट संवाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेचे महापौर यांनी वायसीएम रुग्णालया येथे भेट देऊन विविध विभागांची सर्वंकष पाहणी केली. महापालिका क्षेत्रातील सर्वात मोठ्या व महत्त्वपूर्ण रुग्णालयांपैकी एक असलेल्या या संस्थेत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या उपचारप्रक्रिया, सुविधा आणि एकूण व्यवस्थेचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला.

महापौरांनी आपत्कालीन विभाग, आयसीयू, जनरल व स्पेशालिटी वार्ड, शस्त्रक्रिया विभाग, प्रयोगशाळा, रेडिओलॉजी, फार्मसी, नोंदणी कक्ष तसेच वैद्यकीय शिक्षणाशी संबंधित विभागांना



भेट दिली. संबंधित डॉक्टर आणि अधिकाऱ्यांशी चर्चा करत रुग्णालयातील दैनंदिन कामकाज, उपचारांची गती, उपलब्ध उपकरणांची स्थिती, औषधसाठा, तसेच विद्यार्थी-डॉक्टर प्रशिक्षण प्रक्रियेची माहिती त्यांनी जाणून घेतली.

यावेळी महापौरांनी डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांशी संवाद साधून कामकाजातील आव्हाने, आवश्यक मनुष्यबळ, उपलब्ध संसाधने आणि रुग्णसेवांबाबतचे अनुभव ऐकून घेतले. रुग्णालयातील सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक सुधारणा आणि उपाययोजनांबाबत सूचनाही त्यांनी दिल्या.

**रुग्णांशी थेट संवादातून घेतली सेवा गुणवत्तेची चाचपणी**

महापौरांच्या भेटीदरम्यान रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी थेट संवाद साधण्यावर विशेष भर देण्यात आला. वार्डांमध्ये जाऊन महापौरांनी उपचारप्रक्रियेबाबत समाधान, डॉक्टर व परिचारिकांचा सहकार्यभाव, स्वच्छता, औषधोपचारांची उपलब्धता आणि रुग्णालयातील एकूण वातावरणाबद्दल अभिप्राय जाणून घेतला. अनेक रुग्णांनी वेळेत मिळणारे उपचार आणि कर्मचाऱ्यांची तत्परता याबाबत समाधान व्यक्त केले, तर काहींनी सुविधा वाढविण्याच्या दृष्टीने सूचना मांडल्या.


### पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ‘विचार प्रबोधन पर्वा’त २५० कलाकार, घोडे-उंटांसह नेत्रदीपक महानाट्य

# निगडी प्राधिकरणात ‘शिवगर्जना’चे भव्य सादरीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त १५ ते १९ फेब्रुवारीदरम्यान ‘विचार प्रबोधन पर्वा’चे आयोजन करण्यात आले आहे. शिवरायांच्या पराक्रम, सुशासन आणि राष्ट्राभिमानाच्या विचारांचे स्मरण करून नव्या पिढीला प्रेरणा देण्याच्या उद्देशाने या पर्वाचे नियोजन करण्यात आले आहे.

या पर्वाअंतर्गत निगडी येथील नियोजित महापौर निवास मैदानावर १७, १८ आणि १९ फेब्रुवारी रोजी ‘शिवगर्जना’ या भव्य महानाट्याचे सादरीकरण होणार आहे. मा. राष्ट्रपतींसमोर सादर झालेल्या या नाट्यप्रयोगात



सुमारे २५० हून अधिक कलाकारांचा सहभाग असणार असून घोडे, उंट, भव्य नेपथ्य, प्रकाशयोजना, ध्वनीसंयोजन आणि नेत्रदीपक आतषबाजीच्या माध्यमातून शिवचरित्रातील ऐतिहासिक प्रसंग जिवंत केले जाणार आहेत. १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते महानाट्याचा शुभारंभ होईल.

‘शिवगर्जना’मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मपूर्व काळापासून ते शिवराज्याभिषेक सोहळ्यापर्यंतचा प्रवास रंगमंचावर साकारला जाणार आहे. संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची ऐतिहासिक ‘भक्ती-शक्ती’ भेट, तोरणा विजय, स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, शेतकऱ्यांसाठीचे आज्ञापत्र, प्रतापगड मोहीम, पन्हाळगड वेढा आणि सुटका, स्वराज्य आरमार उभारणी, पुरंदरचा तह, आग्रा भेट, नरवीर तानाजी मालुसरे यांचा कोंढाणा विजय आणि भव्य शिवराज्याभिषेक अशा अनेक प्रसंगांचे सजीव चित्रण होणार आहे. इतिहासाची भव्यता आणि राष्ट्राभिमान जागविणारा हा नाट्यप्रयोग नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

> छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि कर्तृत्व प्रत्येक पिढीसाठी मार्गदर्शक आहेत. ‘विचार प्रबोधन पर्वा’च्या माध्यमातून शिवरायांचे जीवनकार्य आणि स्वराज्याचा संदेश शहरवासियांपर्यंत पोहोचविणे हा हेतू आहे. ‘शिवगर्जना’ या भव्य महानाट्याचा लाभ नागरिकांनी कुटुंबासह उपस्थित राहून घ्यावा.
>
> —महापौर रवि लांडगे

कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, खासदार सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, अमोल कोल्हे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमस्थळी नागरिकांसाठी बैठक व्यवस्था, वाहतूक नियोजन, सुरक्षा व्यवस्था आणि आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६ साठी महापालिकेची नियोजन बैठक संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६ अधिक नियोजनबद्ध, प्रभावी आणि नागरिकांच्या व्यापक सहभागातून राबविण्यासाठी संयुक्त नियोजन बैठक आयोजित करण्यात आली. प्राप्त सूचनांवर संबंधित विभागांमार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तसेच या उपक्रमासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा व समन्वय महापालिकेकडून उपलब्ध करून दिला जाईल, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी केले.

महापालिकेतील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृह येथे झालेल्या या बैठकीस शहरातील विविध शिवजयंती उत्सव समिती, सामाजिक संस्था यांचे पदाधिकारी व प्रतिनिधी तसेच महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीस सह शहर अभियंता मनोज सेटिया, उप आयुक्त अण्णा बोदडे, ममता शिंदे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, कार्यकारी अभियंता सतीश वाघमारे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व मोठ्या संख्येने सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीदरम्यान उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्व अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यासाठी विविध सूचना मांडल्या. महापालिका शाळांमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन व कार्यावर आधारित निबंध, वकृत्व, चित्रकला आदी स्पर्धा आयोजित कराव्यात. तसेच त्यांच्या जीवनावर आधारित भव्य महानाट्याचे आयोजन करावे, अशी मागणी करण्यात आली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### इंदापूरमध्ये तरुणाचे अपहरण

**इंदापूर :** ट्रॅक्टर व्यवहार व सोन्याच्या पैशांच्या वादातून २९ वर्षीय सोहेल शौकत शेख (रा. भरणेवाडी, अंथुर्णे) यांचे अपहरण करून सुमारे २० तास विविध ठिकाणी फिरवत बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली. आरोपींनी जीवे मारण्याची धमकी देत ५० हजार रुपये उकळल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध इंदापूर पोलीस ठाण्यात अपहरण, मारहाण व खंडणीचा गुन्हा दाखल असून पुढील तपास सुरू आहे.

### शिवजयंतीनिमित्त सामाजिक उपक्रमांची रेलचेल

**लोणी काळभोर :** जय भवानी ग्रुपतर्फे यंदाची शिवजयंती सामाजिक उपक्रमांसह उत्साहात साजरी केली जाणार आहे. १९ फेब्रुवारी रोजी पाषाणकर बाग येथे सुप्रसिद्ध गायक व संगीतकार Avadhoot Gandhi यांचा लाईव्ह संगीत कार्यक्रम होणार आहे. त्यांनी 'Sher Shivraj', 'Fatteshikast', 'Subhedar' व 'Pawankhind' चित्रपटांना संगीत दिले आहे. १८ फेब्रुवारीला महिलांसाठी रांगोळी स्पर्धाही होणार आहे. गेल्या सहा वर्षांपासून ग्रुपकडून विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत.

### कदमवाकवस्ती परिसरात ४० किलो गांजा जप्त




**लोणी काळभोर :** कदमवस्ती येथील घोरपडे वस्ती परिसरात पोलिसांनी शनिवारी सकाळी साडेसातच्या सुमारास छापा टाकून सुमारे ४० किलो गांजा जप्त केला. विक्रीसाठी साठवून ठेवलेला हा गांजा हस्तगत करत ४ ते ५ संशयितांना ताब्यात घेण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. पुढील तपास सुरू असून संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

---

### विकासकामांमुळे सुरक्षा धोक्यात; भाविकांनी प्रशासनास सहकार्य करावे - जिल्हाधिकारी

# महाशिवरात्रीलाही श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर राहणार बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले Bhimashankar Temple मंदिर यंदा महाशिवरात्रीलाही दर्शनासाठी बंद राहणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. सुरू असलेल्या व्यापक विकासकामांमुळे सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आला असून भाविकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

भीमाशंकर येथे विकास आराखड्याअंतर्गत मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारण्याची कामे सुरू आहेत. त्यासाठी मंदिर परिसर तीन महिन्यांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला होता. या कालावधीत महाशिवरात्री येत असल्याने सात दिवस मंदिर खुले ठेवण्याचा प्राथमिक विचार प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला होता. मात्र सध्याची प्रत्यक्ष परिस्थिती पाहता हा निर्णय बदलण्यात आला आहे. मंदिर परिसरात सभामंडप, पायरीमार्ग, वाहनतळ, भाविक सुविधा केंद्र, स्नानगृहे, शौचालये, पोलीस ठाणे व पोलीस विश्रामगृह यांसारखी विविध कामे वेगाने सुरू आहेत. मंदिरासमोरील जुना सभामंडप पूर्णपणे उतरविण्यात आला आहे. त्यामुळे मंदिरापुढे तसेच पायरीमार्गावर मोठ्या प्रमाणात दगड, बांधकाम साहित्य आणि यंत्रसामग्री ठेवण्यात आली आहे. ही सामग्री तत्काळ हलविणे शक्य नसल्याने परिसरात मोठी गर्दी झाल्यास अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो.

महाशिवरात्रीच्या कालावधीत, विशेषतः १२ ते १८ फेब्रुवारीदरम्यान, भाविकांची प्रचंड गर्दी अपेक्षित असते. अशा परिस्थितीत बांधकाम सुरू असताना मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे धोकादायक ठरू शकते, असा अहवाल संबंधित विभागांनी प्रशासनास दिला आहे. त्यामुळे भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत महाशिवरात्रीच्या काळात मंदिर नित्यदर्शनासाठी बंद ठेवण्याचा अंतिम निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी स्पष्ट केले की, हा निर्णय श्रद्धेला धक्का देण्यासाठी नसून भाविकांच्या जीवितास प्राधान्य देण्यासाठी घेतला आहे. विकासकामे पूर्ण झाल्यानंतर भाविकांना अधिक सुरक्षित व सुसज्ज सुविधा उपलब्ध होतील. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत संयम बाळगून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, मंदिर बंद राहणार असल्याने भाविकांनी पर्यायी पद्धतीने पूजा-अर्चा करण्याचे नियोजन करावे, तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी परिसरात विशेष बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

---

## काठापुर बुद्रुक येथे वनक्षेत्रावरील अतिक्रमणाचा प्रयत्न हाणून पाडला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ वनविभागाची तात्काळ कारवाई; भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत गुन्हा दाखल

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील काठापुर बुद्रुक येथे राखीव वनक्षेत्रात काही अतिक्रमकांनी सामूहिकरित्या अपप्रवेश करून तात्पुरत्या स्वरूपाच्या कोप्या उभारण्याचा प्रयत्न केला. मात्र जुन्नर वन विभागाच्या पथकाने तात्काळ कारवाई करत हे अतिक्रमण निष्कासित केले.

बुधवारी दुपारी अतिक्रमकांनी वनविभागाच्या हद्दीत कोप्या उभारल्या होत्या. माहिती मिळताच वनअधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत संबंधितांना समज देत कोप्या स्वतःहून काढून घेण्यास सांगितले. त्यांनी नकार दिल्यानंतर वनविभागाने भारतीय वन अधिनियम १९२७ मधील तरतुदीनुसार कारवाई करत कोप्या हटवून अतिक्रमण हटविले. अतिक्रमकांनी आणलेले किराणा, भांडी, धान्य आदी साहित्य त्यांच्या ताब्यात देऊन त्यांना वनक्षेत्राबाहेर करण्यात आले.

यावेळी सहाय्यक वनसंरक्षक जुन्नर अमृत शिंदे यांनी सांगितले की, संबंधितांनी वन हक्क अधिनियम २००६ अंतर्गत १३ डिसेंबर २००५ पूर्वी वनक्षेत्रावर ताबा असल्याचा कोणताही अभिलेखी पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे ग्रामस्तर, उपविभागस्तर व जिल्हास्तरीय समित्यांनी त्यांचे दावे नामंजूर केले आहेत. यापूर्वीही अतिक्रमणप्रकरणी न्यायालयाने संबंधितांना दोषी ठरविले आहे. दरम्यान, संबंधितांनी राष्ट्रीय जनजाती आयोग, दिल्ली येथे दावा दाखल केला असून त्यावर अंतिम निर्णय प्रलंबित आहे. वनविभागाने पुन्हा अतिक्रमणाचा प्रयत्न केल्यास कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

---

## महाशिवरात्रिनिमित्त ब्रह्माकुमारीजमध्ये 'सहस्र शिवलिंग दर्शन' व आरोग्य शिबिर

### १४-१५ फेब्रुवारी रोजी बाणेर येथे दर्शनाची संधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** महाशिवरात्रि पर्वानिमित्त ब्रह्माकुमारीज यांच्या वतीने "सहस्र शिवलिंग दर्शन" आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बाणेर येथील रायकर फार्म हाऊस परिसरातील ब्रह्माकुमारीज सेंटर येथे १४ व १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ८ या वेळेत भाविकांना सहस्र शिवलिंगांचे दर्शन घेता येणार आहे.

महाशिवरात्रिच्या पवित्र निमित्ताने आध्यात्मिक वातावरणात शिवभक्तांना एकाच ठिकाणी सहस्र शिवलिंगांचे दर्शन घेण्याची दुर्मीळ संधी उपलब्ध होणार आहे. दर्शन स्थळी शांत, भक्तिमय आणि सकारात्मक ऊर्जा अनुभवता येईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

यासोबतच समाजहिताचा विचार करत आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. महाशिवरात्रिच्या दिवशी दुपारी ३ ते ४ या वेळेत डॉ. मंगेश (नाडी चिकित्सक) यांचे मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले आहे. नाडी परीक्षणाद्वारे आरोग्यविषयक सल्ला देण्यात येणार आहे. तसेच सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत सर्वसाधारण रोगांची विनामूल्य तपासणी करण्यात येणार आहे.

याशिवाय सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन करण्यात आले आहे. रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात येणार आहे.

आध्यात्मिकता आणि समाजसेवा यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून पाहायला मिळणार असून, परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहस्र शिवलिंग दर्शनाचा लाभ घ्यावा तसेच आरोग्य तपासणी व रक्तदान उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

---

## घोडेगावचा साईनाथ क्रिकेट क्लब महाविजेता!

### 'घोडेगाव प्रीमियर लीग २०२६' रंगली जल्लोषात; अविनाश पाटोळे 'मॅन ऑफ द सिरीज'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** माजी आमदार बी. डी. अण्णा काळे फाउंडेशन व कपिल दिलीपभाऊ काळे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'घोडेगाव प्रीमियर लीग २०२६' (GPL) या भव्य बॉक्स क्रिकेट स्पर्धेचा महासंग्राम नुकताच उत्साहात पार पडला. अंतिम सामन्यात दमदार आणि शिस्तबद्ध खेळ करत घोडेगाव येथील साईनाथ क्रिकेट क्लबने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

माननीय श्री. जयसिंग काका काळे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'अभिमान क्रिकेटचा – सन्मान गावचा' हे ब्रीदवाक्य घेऊन भरवण्यात आलेल्या या स्पर्धेत परिसरातील अनेक नामांकित संघांनी सहभाग नोंदवला होता. संपूर्ण स्पर्धेत खेळाडूंनी क्रीडास्पर्धेची खरी भावना जपत चुरशीचे सामने रंगवले.

अंतिम सामन्यात साईनाथ क्रिकेट क्लबने उत्कृष्ट संघभावना आणि अचूक रणनीतीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. स्पर्धेतील द्वितीय क्रमांक मातोश्री सखुबाई फाऊंडेशन (अमोंडी) संघाने पटकावला, तर तृतीय क्रमांक महाबली क्रिकेट क्लब (सालोबामला) आणि चतुर्थ क्रमांक धर्मराज प्रतिष्ठान (गोणवडी) यांनी मिळवला.

वैयक्तिक कामगिरीत अविनाश पाटोळे याने अष्टपैलू खेळाच्या जोरावर 'मॅन ऑफ द सिरीज' हा किताब पटकावत स्पोर्ट्स सायकल जिंकली. अंतिम सामन्यात निर्णायक खेळी करणाऱ्या गणेश परदेशीला 'मॅन ऑफ द मॅच' पुरस्काराने गौरविण्यात आले. अन्य विभागांमध्ये चेतन कोकणे (उत्कृष्ट फलंदाज), निखिल बिबवे (उत्कृष्ट गोलंदाज), प्रदीप गुप्ता (उत्कृष्ट क्षेत्ररक्षक) आणि ३० वर्षांपुढील गटात योगेश झोडगे यांनी मालिकावीर किताब पटकावला.

स्पर्धेचे आणखी एक मुख्य आकर्षण म्हणजे कपिल काळे यांच्या कल्पनेतून साकारलेला 'भव्य लकी ड्रॉ'. प्रेक्षकांच्या मोठ्या उत्साहात झालेल्या या सोहळ्यात भाग्यवान विजेत्यांना एलईडी टीव्ही, होम थिएटर आणि स्पोर्ट्स वॉच अशा आकर्षक बक्षिसांनी गौरविण्यात आले.

यशस्वी आयोजनाबद्दल कपिल दिलीपभाऊ काळे व आयोजक समितीचे सर्वत्र कौतुक होत असून, पुढील वर्षी 'GPL २०२७' आणखी भव्य स्वरूपात घेण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला. क्रीडाप्रेमींच्या जल्लोषात आणि विजेत्या संघाच्या अभिनंदनाच्या गजरात स्पर्धेची सांगता झाली.

---

## शिवजयंतीनिमित्त राष्ट्रीय शिवनेरी मॅरेथॉनचे आयोजन

### देश-विदेशातील ३ हजारांहून अधिक धावपटूंचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवानिमित्त सलग चौथ्या वर्षी राष्ट्रीय पातळीवरील शिवनेरी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवनेरी ट्रेकर्स असोसिएशन, मोर्डे फुड्स आणि पोल्ट्री ब्रिडर्स कॉर्डिनेशन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (ता. १५) ही स्पर्धा रंगणार आहे.

या स्पर्धेत केनियाच्या धावपटूंचा संघ सहभागी होणार असून देश-विदेशातील तीन हजारांहून अधिक स्पर्धक सहभागी होणार असल्याची माहिती शिवनेरी ट्रेकर्सचे अध्यक्ष नीलेश खोकराळे यांनी दिली.

ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्यापासून पहाटे साडेपाच वाजता स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. पाच, दहा आणि एकवीस किलोमीटर अशा तीन गटांत ही मॅरेथॉन पार पडणार आहे. स्पर्धेचा मार्ग कुसूर-तलाखी-वडज-पारुडे-काटेडे असा निश्चित करण्यात आला असून सर्व गटांच्या शर्यतींची सुरुवात व समारोप किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी असलेल्या दत्त मंदिरासमोरील मैदानात होणार आहे. शिवजन्मभूमीच्या सान्निध्यात होणारी ही स्पर्धा केवळ क्रीडा स्पर्धा नसून शिवरायांच्या पराक्रमाला अभिवादन करणारा प्रेरणादायी उपक्रम ठरणार आहे. स्पर्धेमुळे जुन्नर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शिवजयंतीच्या निमित्ताने 'जय शिवराय'च्या घोषणांनी परिसर दुमदुमणार आहे.

---

## धोम-बलकवडी कालव्यात महिलेचा मृतदेह; भोर हादरले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोर :** तालुक्यातील चिखलगाव रावडी हद्दीत असलेल्या धोम-बलकवडी धरणाच्या डाव्या कालव्यात ३० ते ३५ वर्षांच्या महिलेचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. मृत महिलेची ओळख राधिका सुरेश सावंत अशी पटली आहे.


स्थानिक नागरिकांना कालव्यात मृतदेह वाहताना दिसताच त्यांनी पोलिसांना कळवले. भोर पोलीस घटनास्थळी दाखल होत ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला. प्राथमिक तपासानुसार ओळख निश्चित करण्यात आली असून मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आत्महत्या की घातपात, याचा तपास सुरू असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

---

## लोकवर्गणीतून पळसनाथ मंदिराला आकर्षक रंगरंगोटी

### सौंदर्याला नवी झळाळी; १४४ मूर्तींनी सजलेले शिखर ठरते आकर्षण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**इंदापूर :** प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पळसदेव (ता. इंदापूर) येथील ग्रामदैवत Shri Palasnath Temple मंदिराला ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून करण्यात आलेल्या आकर्षक रंगरंगोटीमुळे नवी झळाळी प्राप्त झाली आहे. मंदिरावरील कोरीव नक्षीकामात विविध रंग भरल्याने संपूर्ण मंदिराचे सौंदर्य खुलून दिसत असून भक्तांचे लक्ष वेधून घेत आहे.

उजनी धरणामुळे गावाचे पुनर्वसन झाल्यानंतर प्राचीन पळसनाथ मंदिरातील शिवलिंगाची नव्या गावठाणात बांधलेल्या मंदिरात विधिवत स्थापना करण्यात आली. मंदिराचे रूप बदलले असले तरी ग्रामस्थांची देवावरील अढळ श्रद्धा कायम आहे. पळसनाथ हे भगवान शिवाशी संबंधित असल्याने मंदिरातील शिवलिंग आणि उंच शिखर आध्यात्मिकतेचे प्रतीक मानले जाते. शिखराची रचना दक्षिण भारतीय द्रविड शैलीतील असून गोपुरम पद्धतीचे बहुमजली स्वरूप त्याला वैशिष्ट्यपूर्ण बनवते. सन १९८६ ते १९८८ दरम्यान उभारण्यात आलेल्या या ५१ फूट उंच मंदिरासाठी पणदरे (ता. बारामती) येथून पाषाण दगड आणण्यात आला. बारामतीचे वास्तुविशारद शहा यांनी मंदिराचे आराखडे तयार केले, तर तामिळनाडूतील शिखर कारागीर एन. सन्मुख सुंदरम यांच्या टीमने सुमारे ७३ हजार रुपयांत भव्य शिखर उभारले. शिखरावर गणेश, विष्णू, देवी, शिवपरिवार अशा सुमारे १४४ मूर्ती आणि नाजूक कलाकुसर पाहायला मिळते. सर्वात वर सुवर्ण कलश असून तो समृद्धीचे प्रतीक मानला जातो. सध्या सुरू असलेल्या रंगकामासाठी सुमारे ८ लाखांचा खर्च अपेक्षित असताना ग्रामस्थांनी सढळ हाताने मदत करत ९ लाख रुपये जमा केले आहेत. यापैकी सुमारे २ लाख मजुरी व ६ लाख रुपये रंगखरेदीसाठी खर्च होणार आहेत. तसेच मंदिर परिसरात बगीचाही विकसित करण्यात येणार आहे.

---

### ढोरे भांबुरवाडी (ता. खेड) येथे भीषण अपघात; आठ विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत

# स्कूल बसला हायवा ट्रकची धडक;4 वर्षांचा बालक गंभीर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** राजगुरुनगर : खेड तालुक्यातील ढोरे भांबुरवाडी परिसरात गुरुवारी (दि. १२) दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास शाळेची बस आणि हायवा ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातात चार वर्षांचा एक बालक गंभीर जखमी झाला असून आठ विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून पालकवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पानमळा येथील डी. जे. केंब्रिज स्कूलची बस (क्र. एमएच १४ जीडी ४१९१) विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी जात असताना समोरून येणाऱ्या हायवा ट्रकने (क्र. एमएच १३ सीयू ६२३५) जोरदार धडक दिली. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, रस्त्याचे काम सुरू असल्याने अर्धाच रस्ता वाहतुकीसाठी खुला होता. अशा परिस्थितीत ट्रक चालकाने वेग आणि रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे वाहन चालविले. त्यामुळे बसला समोरासमोर धडक बसली.

धडकेमुळे बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने बस रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल खड्ड्याजवळ जाऊन अडकली. खड्डा अतिशय खोल असल्याने मोठी दुर्घटना टळल्याचे स्थानिकांनी सांगितले. अपघातात शिवांश नवनाथ मांजरे (वय ४ वर्षे ६ महिने) हा बालक गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे.

याशिवाय कार्तिकी सुरेश जरे (१५), पियुश जरे (९), रुद्र जरे (९), ध्रुव प्रविण राक्षे (५), यश रमेश जरे (९), आयुष अल्पेश राक्षे (६), शिवम पिंगळे (६) आणि आयुष जरे (६) या विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. अपघातानंतर तात्काळ स्थानिक नागरिकांनी मदतकार्य सुरू केले. जखमी विद्यार्थ्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

---

## लोणी काळभोरमध्ये वाहतूक पोलिसांवर 'दुहेरी न्याय'चा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी काळभोर :** परिसरात वाहतूक पोलिसांच्या कारवाईवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. Pune-Solapur Highway मार्गावर अवजड व अवैध प्रवासी वाहतूक दिवसाढवळ्या सुरू असताना सामान्य दुचाकीस्वारांनाच लक्ष्य केले जात असल्याचा आरोप होत आहे.

लोणी स्टेशन चौक व थेऊर फाटा येथे ११ ते १४ फेब्रुवारीदरम्यान वाहतूक पोलिसांकडून रस्त्यातच वाहने अडवून दंड आकारला जात आहे. त्यामुळे महामार्गावर वाहतूक कोंडी वाढत असून कामावर जाणारे कर्मचारी, शेतकरी व विद्यार्थी तासन्तास अडकून पडत आहेत. हजारो रुपयांच्या दंडामुळे कष्टकरी वर्ग त्रस्त झाल्याचे चित्र आहे. दरम्यान, ओव्हरलोड ट्रक, खासगी बस तसेच नियमबाह्य प्रवासी वाहतूक करणारी रिक्षा व सहा-सीटर वाहने मात्र निर्धास्तपणे धावत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. रिक्षामध्ये ८ ते १० प्रवासी, तर सहा-सीटरमध्ये ११ ते १२ प्रवासी कोंबून वाहतूक केली जात असल्याचे समोर आले आहे. हडपसर ते वरवंड दरम्यान ही अवैध वाहतूक खुलेआम सुरू असल्याचा आरोप आहे. "मोठ्यांना मोकळीक, छोट्यांवर कारवाई" असा दुहेरी न्याय थांबवून अवजड व अवैध वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## सारांश वृत्त

### चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या अध्यक्षपदी कुमार डी

नवी दिल्ली : देशातील सनदी लेखापालांची सर्वोच्च संस्था असलेल्या 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया'च्या वर्ष २०२६-२७ या कार्यकाळासाठी नवीन नेतृत्वाची घोषणा करण्यात आली आहे. संस्थेच्या अध्यक्षपदी सीए प्रसन्न कुमार डी यांची, तर उपाध्यक्षपदी सीए मंगेश पांडुरंग किनरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. सीए प्रसन्न कुमार डी १९८४ पासून सनदी लेखापाल म्हणून कार्यरत आहेत. ते प्रसन्न कुमार डी मंगेश किनरे 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया' चे फेलो मेंबर आहेत.

--------------------

### एलएलबी, बीएड-एमएड, सीईटी नोंदणीला मुदतवाढ

मुंबई : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे २०२६-२७ साठी घेण्यात येणाऱ्या एलएलबी, बीएड-एमएड आणि बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन या तिन्ही अभ्यासक्रमांच्या सीईटी प्रवेश नोंदणीला २८ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ दिली आहे. आतापर्यंत एलएलबी (३ वर्षीय) अभ्यासक्रमासाठी ६२ हजार ५०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

--------------------------------

### गव्हासह साखरेच्या निर्यातीला परवानगी

नवी दिल्ली : केंद्र सरकारने २५ लाख मेट्रिक टन गहू आणि पाच लाख टन जादा साखरेच्या निर्यातीला मंजुरी दिली आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या कृषी उत्पादनाचे उचित मूल्य मिळावे आणि स्थानिक बाजारातील संतुलन अशा दोन्ही उद्देशाने सरकारने हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय गव्हाची किंमत प्रतिटन जास्त असल्याचे दिसून आले आहे. भारतापेक्षा अर्जेंटिनाचा गह अधिक स्वस्त आहे. त्यामुळे गव्हाची विक्री करणे हे भारतीय शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक ठरू शकते. भारतीय गव्हाची किंमत २८० डॉलर असून त्या तुलनेत अर्जेंटिनाचा गहू दोनशे डॉलर प्रतिटन दराने उपलब्ध आहे. अर्थात भारतीय गव्हाचा दर्जा अर्जेंटिनाच्या तुलनेत चांगला असल्यामुळे शेतकऱ्यांना लाभ होण्यात फारशी अडचण नसल्याचे सांगण्यात आले.

## तेलंगणातील नगरपालिकेच्या निकालात

# काँग्रेसचा जबरदस्त विजय!

## भाजपाला मोठा पराभव आणि BRS ला धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : (काँग्रेस) पक्षाने तेलंगणामधील नगरपालिकांच्या २०२६ चे निकाल जाहीर झाल्यावर राज्यभर मोठा विजय मिळवला आहे. या नगरपालिकांच्या निवडणुकीत काँग्रेसने स्पष्ट बहुमत मिळवून २,९९५ पैकी तब्बल १,५३७ प्रभागांमध्ये निर्णायक विजय मिळवला, ज्यामुळे ती सर्वात मोठी पक्ष म्हणून उभी राहिली आहे.**



शुक्रवारी (११ फेब्रुवारी) सात महानगरपालिका आणि ११६ नगरपालिकांमध्ये मतदान झाले होते. निकालानुसार, काँग्रेसने ७० नगरपालिकांमध्ये बहुमत मिळवला आणि चार महानगरपालिकांवरही आपले नियंत्रण मिळवले आहे. या निकालामुळे राज्यातील शहरी राजकीय परिदृश्यात काँग्रेसचा प्रभुत्व स्पष्टपणे दिसून येते.

तर भाजपचे निकाल अपेक्षेइतके अर्थपूर्ण नव्हते आणि पक्षाला मोठा पराभव झेलावा लागला आहे. भाजपाला फक्त ३३६ प्रभागांमध्ये विजय मिळाला असून, त्याचे प्रादेशिक दबदबा बनवण्याचे प्रयत्न या निकालात पुरेसे प्रतिबिंबित झाले नाहीत. या निकालाबद्दल भाजपकडून मतभाव वाढल्याचे दावा केला जात असला तरीही त्याचा प्रभावी परिणाम निकालात दिसून येत नाही.

बीआरएसला देखील मोठा धक्का बसला आहे आणि त्याचा प्रभाव मागील निवडणुकांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी झाला आहे, ज्यामुळे विरोधी पक्ष म्हणून त्याचे स्थान प्रभावित झाले आहे.

### राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता

राजकारण तज्ञांचे मत आहे की हा निकाल राज्यातील जनाधार आणि शहरी विकास विषयक मतदारांच्या भावनांचा प्रतिबिंब आहे आणि यामुळे आगामी काळातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. काँग्रेसचा हा विजय राज्य सरकारच्या कार्यकारणी व लोकहिताचे धोरण म्हणून पाहिला जात आहे, तर भाजप आणि BRS दोघांनाही आपल्या धोरणांवर पुनर्विचार करण्याची गरज असल्याचे विश्लेषक म्हणतात.

या नगरपालिकांच्या निकालाला राज्यातील शहरी मतदारांचा तेव्हा प्रतिसाद असल्याचे दिसते आणि हे निकाल आगामी निवडणुकांच्या रणनीतींमध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. पुढील टप्प्यात महानगरपालिकांच्या अध्यक्षपद व डबेरीच्या निवडीसाठी १६ फेब्रुवारीला पुढील प्रक्रिया पार पडणार आहे.

## कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणार

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा शब्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** अजित पवार हे कायम कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहत असत. त्यानंतर आता तुमच्या पाठीशी कोणी नाही असे समजू नका. ज्याप्रमाणे अजितदादा कार्यकर्त्यांच्या मागे उभे राहून त्यांचे काम करत असत, त्याचप्रमाणे काम केले जाईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री तसेच पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केले. तसेच पूर्वीप्रमाणे पक्षाचे काम करत राहा, असेही त्यांनी यावेळी सांगितले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार पुणे दौऱ्यावर असून, सर्किट हाऊस येथे शुक्रवारी खेड,आंबेगाव, जुन्नर, शिरूर, हवेली, मावळ तालुक्यांतील नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांची भेट घेतली.

यावेळी त्यांनी निवडणुकीदरम्यान काय घडले, हेही जाणून घेतले. शिरूरचे आमदार ज्ञानेश्वर कटके, भोरचे आमदार शंकर मांडेकर, जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके, तसेच खेड-आळंदीचे माजी आमदार दिलीप मोहिते-पाटील, अशोक पवार यांनीही यावेळी सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने ७३ गटांपैकी ५१ गटांमध्ये विजय मिळवला आहे. त्या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी या भागातील सर्व नवनिर्वाचित जि.प.व.पं.स. सदस्यांची ओळख करून घेतली.

## आमदारांच्या तब्बल २३ जागा रिक्त

### राज्यपाल कोट्यातील पाच जागा भरल्या जाण्याची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** विधानपरिषदेतील राज्यपाल कोट्यातील पाच रिक्त जागांबाबत राजकीय वर्तुळात हालचाली वेगाने सुरू झाल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांच्या म्हणण्यानुसार या जागा लवकरच भरल्या जाण्याची शक्यता असून, त्यासाठी प्राथमिक स्तरावर चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना या निवडीत प्राधान्य दिले जाऊ शकते, - अशी माहिती मिळत आहे. त्यामुळे - या पाच जागांवर कोणाची निवड होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ही घडामोड विधानपरिषद या सभागृहाच्या पुढील राजकीय - समीकरणांवर प्रभाव टाकणारी ठरू शकते. सध्या विधानपरिषदेत एकूण ७८ सदस्यसंख्या असताना त्यापैकी ५५ सदस्य कार्यरत आहेत, तर २३ जागा रिक्त आहेत. याच पार्श्वभूमीवर १४ मे २०२६ रोजी आणखी नऊ जागा रिक्त होणार आहेत. या नऊ जागा विधानसभेतील आमदारांमार्फत निवडून आलेल्या सदस्यांच्या आहेत. त्यामुळे या जागांसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार असून त्यातून नव्या सदस्यांची निवड होईल. या नऊ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येणार आहे. परिणामी, पुढील काही महिन्यांत विधानपरिषदेचे चित्र लक्षणीयरीत्या बदलण्याची चिन्हे आहेत. ज्या सदस्यांचा कार्यकाळ संपत आहे त्यामध्ये उद्धव ठाकरे, निलम गो-हे, अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, राजेश राठोड, संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केनेकर आणि रणजितसिंह मोहिते पाटील यांचा समावेश आहे. सध्या विधानसभेत २८६ आमदार असल्याने मतदानाचा कोठा ३६ आमदारांवर जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या गणितामुळे पक्षीय समीकरणे आणि संभाव्य आघाड्या यावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. विधानसभेपेक्षा वेगळी आहे. हे सभागृह दर पाच वर्षांनी विसर्जित होत नाही. सदस्यांचा कार्यकाळ सहा वर्षांचा असतो. एकूण ७८ सदस्यांपैकी ३० सदस्य विधानसभेतील आमदारांकडून निवडले जातात. २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींकडून निवडून येतात. शिक्षकांमधून ७ आणि पदवीधरांमधून ७ सदस्य निवडले जातात. तर १२ सदस्यांची नियुक्ती राज्यपाल साहित्य, कला, सहकार आणि सामाजिक सेवा या क्षेत्रांतून करतात. याच राज्यपाल कोट्यातील पाच जागा सध्या रिक्त असून त्या लवकरच भरण्यात येण्याची शक्यता आहे. या राज्यपाल कोट्यातील निवडींमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रभावी कामगिरी केलेल्या व्यक्तींना संधी दिली जाईल, अशी चर्चा आहे. त्यामुळे महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आदी स्तरांवर काम केलेल्या आणि संघटनात्मक ताकद असलेल्या व्यक्तींना संधी मिळू शकते. या पार्श्वभूमीवर विविध पक्षांकडून आपापल्या पातळीवर नावांची चाचपणी सुरू असल्याचे समजते. परिणामी, या पाच जागांची निवड केवळ औपचारिक न राहता राजकीय दृष्ट्या महत्त्वाची ठरणार आहे.

## टी-२० विश्वचषकातून ओमान बाहेर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आयसीसी टी-२० आंतरराष्ट्रीय विश्वचषक २०२६ स्पर्धेच्या नवव्या दिवशी (रविवार, १५ फेब्रुवारी) भारत-पाकिस्तान महामुकाबल्याची उत्सुकता शिगेला पोहोचली असतानाच स्पर्धेच्या आठव्या दिवशी पहिला संघ अधिकृतपणे बाहेर पडला आहे. ओमान राष्ट्रीय क्रिकेट टीमचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे. १४ फेब्रुवारी रोजी झालेल्या २२व्या सामन्यात आयर्लंड क्रिकेट टीम आणि ओमान आमनेसामने होते. दोन्ही संघांनी याआधीचे सामने गमावल्यामुळे हा सामना 'करो या मरो' स्वरूपाचा होता. मात्र आयर्लंडने एकतर्फी कामगिरी करत ९६ धावांनी विजय मिळवला आणि स्पर्धेतील आपले आव्हान कायम ठेवले. प्रथम फलंदाजी करताना आयर्लंडने दमदार फटकेबाजी करत २० षटकांत ५ गडी गमावून तब्बल २३५ धावांचा डोंगर उभारला. ही या विश्वचषकातील आतापर्यंतची सर्वात मोठी धावसंख्या ठरली. प्रत्युत्तरात ओमानचा डाव आयर्लंडच्या भेदक गोलंदाजीपुढे टिकू शकला नाही. ओमानचा संघ १८ षटकांत १३९ धावांवर सर्वबाद झाला. या पराभवासह ओमानचे स्पर्धेतील आव्हान संपले, तर आयर्लंडने विजयाचे खाते उघडत पुढील फेरीची आशा जिवंत ठेवली.

## लाचखोरी कारवाईमागे भाजप

### काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केला संशय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लाचखोरीच्या प्रकरणामागे भाजपचा हात असल्याचा संशय काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केला आहे. महायुती सरकार टक्केवारीचे आहे. त्यामुळे नरहरी झिरवाळ यांना बदनाम करण्यासाठी भाजपनेच रचलेले हे कुभांड असू शकते, असे त्यांनी म्हटले आहे.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिक राजेंद्र ढेरंगे यांना ५० हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने अटक केली आहे. चक्क मंत्रालयात लाचखोरीची ही घटना घडल्यामुळे राज्याच्या राजकीयवर्तुळात एकच खळबळ माजली आहे. मंत्री झिरवाळ यांनी या प्रकरणाशी आपला संबंध आढळला तर आपण तत्काळ राजीनामा देऊ अशी भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी या प्रकरणावर संशय व्यक्त केला आहे. नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील क्लार्कला लाच घेताना पकडणे, हे भाजपचे राजकीय षडयंत्र असू शकते. विरोधकांना आणि मित्रपक्षांना बदनाम करण्यासाठी सरकारी यंत्रणांचा वापर करणे हा यांचा जुना धंदा आहे. स्वतः 'टक्केवारी'च्या चिखलात रुतलेल्या सरकारने दुसऱ्यावर चिखलफेक करू नये. हे टक्केवारीचे सरकार आहे. आता मंत्रालयातही या गोष्टी चालू झाल्या आहेत. कोणत्याही कार्यालयात जा टक्केवारीचा हिशोब आहे. आता ते उघड झाले आहे. प्रत्येक मंत्र्याच्या कार्यालयात उघडपणे टक्केवारी मागितली जाते, असे ठाकूर यांनी म्हटले आहे. यशोमती ठाकूर यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारवरही टीका केली. सध्या शेतकऱ्यांचे हाल सुरू आहेत. त्यांच्या मालाला भाव नाही. टॅरिफच्या मुद्यावर केंद्र सरकार तोंड उघडायला तयार नाही. सरकारचा प्रत्येक निर्णय हा बळीराजाच्या विरोधात येत आहे. भाजपने देश अमेरिकेला विकला आहे.

### रोहित शेट्टी, रणवीर सिंह यांना पुन्हा धमकी

**मुंबई :** निर्माता-दिग्दर्शक रोहित शेट्टी आणि अभिनेता रणवीर सिंह यांना पुन्हा सोशल मीडियावरुन धमकी देण्यात आल्याचे वृत्त आहे. दोघांनीही पोलिसांत तक्रार केली नसली तरी सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या धमकीच्या मॅसेजची मुंबई पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाकडून शहानिशा केली जात आहे.

## आधार-अपार सक्तीतून सीईटी सेलचा अखेर यू-टर्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** सीईटी २०२६ नोंदणीदरम्यान आधार आणि अपार प्रमाणीकरणाची सक्ती करून विद्यार्थ्यांना अडचणीत टाकणाऱ्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने अखेर माघार घेतली आहे. तांत्रिक कारणांमुळे आधार-अपार प्रमाणीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांनाही आता त्याशिवाय अर्ज सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. शुक्रवारपासून हा निर्णय लागू करण्यात आला आहे.

## 'हून नाथुराम' गुजराती नाट्यप्रयोग गुजरातमध्ये रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महात्मा गांधीची हत्या करणाऱ्या नथुराम गोडसेची भूमिका मांडणारे हून नाथुराम या नाटकाचे प्रयोग गुजरातमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांनी विरोध केल्याने रद्द करण्यात आले. हून नाथुराम हे मी नथुराम गोडसे बोलतोय या प्रदीप दळवींच्या नाटकाचा गुजराती अनुवाद चिंतन शहा आणि इंग्रजी अनुवाद भरत दाभोळकर यांनी केला आहे. दिग्दर्शनही भरत दाभोळकर यांचे असून निर्मात्या सेजल सावंत पेंटर या आहेत. गुजराती नाटकाचे प्रयोग ४ ते ८ फेब्रुवारी दरम्यान गुजरातमधील सुरत, बडोदा, भावनगर येथे पार पडले. मात्र ७ फेब्रुवारी रोजी राजकोट येथे होणाऱ्या प्रयोगाला काँग्रेस कार्यकर्त्यांनी विरोध करून पुढील प्रयोग न करण्याचा इशारा दिला, त्यामुळे जामनगर व अहमदाबाद येथील प्रयोग आम्ही रद्द केल्याचे या नाटकाच्या निर्मात्या सेजल पेंटर सावंत यांनी सांगितले.

## चांदीच्या किंमतीत ऐतिहासिक घसरण

### भाव आणखीनच कमी होणार की तेजी परत येणार? तज्ज्ञांचे मत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अलीकडेच चांदीच्या किंमतीत मोठी घसरण दिसून आली आहे. गेल्या काही आठवड्यांत चांदीने अफाट तेजी घेतली होती आणि तिचा भाव प्रति औंस १२१ डॉलर्सचा विक्रमी उच्चांक गाठला होता. मात्र, फेब्रुवारीच्या सुरुवातीस जागतिक बाजारात चांदीचा भाव प्रति औंस सुमारे ८८ ते ९२ डॉलर्सपर्यंत घसरल्याचे नोंदले गेले आहे, ज्यामुळे गुंतवणूकदार आणि ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. जागतिक आणि देशांतर्गत बाजारातील चढ-उताराचे अनेक कारणे आहेत. प्रमुख घटकांमध्ये युनायटेड स्टेट्समधील आर्थिक अटी, फेडरल रिझर्व्हचा धोरणात्मक निर्णय, डॉलरचे चलनबदल आणि गुंतवणूकदारांची मुनाफावसूली यांचा समावेश आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून चांदीची किंमत तात्पुरते कोसळली आहे. विशेष म्हणजे, भारतातील सुवर्ण बाजारपेठेतही चांदीचे भाव मोठ्या प्रमाणात घसरले आहेत. उदाहरणार्थ, काही बाजारात चांदीचे दर जीएसटीसह प्रति किलो सुमारे ₹२,५७,५०० इतके होते, जे मागील उच्चांकापेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहेत. चांदीच्या दरातील ही घसरण गुंतवणूकदारांसाठी धोका आणि संधी, दोन्ही बनण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांचे मत आहे की सध्याची उलटफेर बाजारी चक्राचा भाग आहे आणि संक्षेपात काही चढ-उतार अपेक्षित आहेत; परंतु दीर्घकालीन ट्रेंड मागील बलाढ्य मागणी आणि औद्योगिक उपयोगामुळे मजबूतच राहू शकतो, असेही सांगितले जात आहे.

## मुलुंडमध्ये मेट्रो बांधकामादरम्यान स्लॅब कोसळला; एकाचा मृत्यू, एक गंभीर जखमी

### चारचाकी व रिक्षावर पडला काँक्रीट स्लॅब; रस्ता वाहतुकीसाठी बंद



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुलुंड येथे मेट्रोच्या बांधकामादरम्यान मोठी दुर्घटना घडली असून काँक्रीटचा जड स्लॅब अचानक कोसळल्याने एकाचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना मुलुंड फायर ब्रिगेडजवळ दुपारच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, मेट्रो पुलाच्या कामासाठी उभारण्यात आलेल्या संरचनेचा एक भाग अचानक कोसळला. हा स्लॅब थेट रस्त्यावरून जात असलेल्या एका चारचाकी गाडीवर आणि रिक्षावर पडला. स्लॅबचा भार इतका मोठा होता की दोन्ही वाहने मोठ्या प्रमाणात चेंगरली गेली. दुर्घटनेत एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरी व्यक्ती गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन आणि अग्निशमन दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. बचावकार्य सुरू करताना प्रथम स्लॅब हटवून त्याखाली अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यात आले. काही काळासाठी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मोठ्या प्रमाणावर नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली होती.

या दुर्घटनेनंतर संबंधित रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. वाहतूक इतर पर्यायी मार्गांवर वळवण्यात आली असून त्यामुळे काही प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. पोलिसांनी परिसरात बंदोबस्त वाढवून परिस्थिती नियंत्रणात ठेवली आहे.

मेट्रो प्रकल्पाच्या कामाबाबत यापूर्वीही सुरक्षेच्या दृष्टीने प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. बांधकामादरम्यान योग्य सुरक्षा उपाययोजना केल्या जात आहेत का, याबाबत स्थानिक नागरिकांकडून शंका व्यक्त केली जात होती. अशातच ही घटना घडल्याने सुरक्षेच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दुर्घटना नेमकी कशी घडली, बांधकामातील कोणती तांत्रिक चूक कारणीभूत ठरली का, तसेच काम करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई होणार का, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. प्रशासनाने प्राथमिक चौकशी सुरू केल्याची माहिती मिळत आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला आहे.

दरम्यान, जखमी व्यक्तीची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून मेट्रो प्रकल्पाच्या सुरक्षेवर अधिक कठोर उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. प्रशासनाची पुढील भूमिका काय असेल आणि दोषींवर कोणती कारवाई होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सर्वोपचार मध्ये नेमके उद्धट वागले कोण ?

## आ. पठाण यांची माघार, तरीही व्यवस्थेला इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अकोला : जिल्ह्यातील सर्वोपचार रुग्णालय, अकोला पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. गुरुवारी अचानक केलेल्या पाहणीदरम्यान अनेक गंभीर त्रुटी निदर्शनास आल्याचा दावा आ. पठाण यांनी केला.**



रुग्णांना मिळणाऱ्या सुविधांचा दर्जा, स्वच्छतेची अवस्था, डॉक्टरांची अनुपस्थिती तसेच वॉर्डमधील नर्सेस, वार्डबॉय आणि सुरक्षा रक्षकांकडून मिळणाऱ्या कथित उद्धट वागणुकीच्या तक्रारींमुळे वातावरण चांगलेच तापले.मागील काही महिन्यांपासून रुग्णालयातील एकूणच व्यवस्था कोलमडल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने येत होत्या. विशेषतः रुग्णांना दिल्या जाणाऱ्या जेवणाच्या दर्जाबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत होती. काही ठिकाणी अन्न निकृष्ट दर्जाचे असल्याचे, तर काही वॉर्डमध्ये स्वच्छतेचा अभाव असल्याचे पाहणीत समोर आले. अनेक वेळा डॉक्टर वेळेवर उपलब्ध नसल्याच्या तक्रारीही रुग्णांनी केल्याचे आ. पठाण यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे. पाहणीदरम्यान मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. रुग्णांना देण्यात येणारे जेवण प्रत्यक्ष तपासून त्यामध्ये तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले. वॉर्डनिहाय पाहणी करताना काही ठिकाणी रुग्णांच्या तक्रारी, तर काही ठिकाणी प्रशासनाच्या मर्यादा आणि मनुष्यबळाची कमतरता समोर आल्याचे सांगण्यात आले. रुग्ण व नातेवाईकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. दरम्यान, एका वॉर्डमध्ये महिला रुग्ण व तिच्या नातेवाईकांनी तेथे उपस्थित असलेल्या नर्स व सुरक्षा रक्षकांकडून मिळणाऱ्या कथित उद्धट वागणुकीबाबत तक्रार केली.

### ढिसाळ व्यवस्थापन उघड

या संपूर्ण घडामोडींमुळे सर्वोपचार रुग्णालयातील व्यवस्थापन, कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यातील तणाव उघडपणे समोर आला असून, आता प्रशासन कोणती ठोस पावले उचलते याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.